

१९९२ १५६६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५६
REFBK-0012746
REFBK-0012746

# स्वप्नजा

पद्मा

मौज प्रकाशन

मुंबई ४

९२८४६

REFBK-0012746

REFBK-0012746

मौज प्रकाशन : ६४

पहिली आवृत्ति, २० फेब्रुवारी १९६२

© १९६२, पद्मावती गोळे

वेष्टनावरील चित्र :
पद्मा सहस्रबुद्धे

किंमत चार रुपये

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

# अनुक्रम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 33723 ........ वि: ...
क्रमांक ...9545..... नों दि: ...

धार १
नाचणमोगरी २
सहल ३
शरदामधली चांदरात ४
फूल जुईचें ५
तोल सुटावा ६
किती दिसापासुनीया ७
कूस ८
स्वप्न तेंच का फुलतें आहे? ९
मजला तूं १०
हें नव्हतें मज बोलायाचें ११
मी इथली १२
आषाढांच्या घनांबरोबर १४
तलम रुपेरी पंख १५
ये फाल्गुन १६
वृथाच स्मरतें १७
उरलें मीं तेवढीच १८
एक क्षणाचा पक्षी १९
माझें दुःख आलें घरा २०
पुरे २२
स्वप्नांनो २३

92084

मौन तुझें २४
असे असीमाचे ओठ २५
रितेपण २६
दुःख हवें २७
ठाउक मज २९
ये ज्येष्ठ पौर्णिमा ३०
मी अंधार होऊन लपलें होतें ३२
आठवते ती गती अनावर ३४
कालनदीवर ३५
सुख ३७
एक क्षण येतो ३८
पूल ४०
मूळ ४२
तिथेच तर ४३
आडोसा ४४
ढग दाटती ४६
भर दिवसाहि कधी ४७
दर्शनबधिरा ४९
मीलनवेळा ५०
अवेळस्वप्ना ५१
अशी अकल्पित ५२
आठवतें आठवतें ५४
ती सकाळ सावध ५५
नको नको ना ५६
डोळ्यांत प्रतीक्षा ५७
आरशांत बघतां मी ५८
क्षणाक्षणाला जन्म नवा ६०

नको म्हणूंस एकटी ६२
कावा ६३
त्या पत्रांतिल अक्षर ६४
रिता घट सखे भरला ग ६६
तुझ्या मनाचें आकाश ६७
अन् तेव्हापासुनिया ६९
नजर तुझी ७०
वाट ७१
दुःख असें हें ७२
उत्तर ७३
स्वप्नगौर ७५
धाम तुझें ७६
स्तब्ध किनारीं ७७
जिद्द तुझी ७८
स्वप्नभूल ७९
तूं ८१
अतृप्त ८२
पहाट-स्वप्न ८४
तुला कल्पिलें मी होतें ८६
मनस्विनी ८७
वळिवाचा पाऊस ८८
टकटक ८९
जीवनलहरी ९१

## घार

तुझ्या स्मृतींची घार अनावर
गगनावर माझ्या गरगरते
दृष्टि खिळवुनी तीक्ष्ण अधाशी
कणकण माझा टिपुनी घेते

नजर तिची चुकवून कधी मी
घास सुखाचा मुखा लावितें
अवचित येउन तीरासम ही
तोच नेमका झडपुनि नेते

कधी चिडुनि मी सर्प काढितें
मनांत माझ्या सुखावलेला
तोहि हिच्या झडपेंत गवसुनी
भोवंडुनि हो अर्धामेला

अशी कशी ही घार चेटकी
तिला वारण्या बळ नच हातीं
मंत्रमुग्ध मी बसें भुकेली
दृष्टि खिळवुनी अशीच वरती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम 33973 दि: ...
क्रमांक 73649 नों दि: ...

# नाचणमोगरी

मनीं रंगते मैफल
हुंदक्यांच्या तालावरी
पीत आसवें हो धुंद
आशा नाचणमोगरी

एका गिर्कीत निर्मिते
लाख वासनाप्रेक्षक
जशा खिळल्या नजरा
पोचे शिगेला कौतुक

अशी लवे तशी लवे
वीज झंकारे घुंगुरीं
झगा उडवीत उंच
डोळे मोडी निलाजरी

मात्र फेकितां मीं नाणें
ज्याच्यावरी तुझें नाम
बंद करूनियां चाळे
करी मोगरी सलाम.

# सहल

सहल गमतिची—
दुपार तापुन पेंगुळलेली,
आणि पांगली संगत-सोबत, झुबके करुनी
मदिर कथांची सुस्ती चाखित
स्थिरावली क्षण.
तूं मी दोघें, कुणि न म्हणावें उगीच कांही—
अंतर इतुकें ठेवुनि, श्रवणाच्या पलिकडचें
दूर बैसलों निंबाच्या छायेमधि
गुंफित अपुलीं गुपितें,
गंधें ज्यांच्या नाजुक क्षण बेसावध झाला,
स्पर्श ओलसर गरम दोन बोटांचा
गालावर हुळहुळला,
"हा रंग कशाचा गालावरती ?"
"कुठें ?" गुंतलीं बोटामधि क्षण बोटें,
त्या झोल्यावर अवघडलेला बेसावध क्षण
सुखावलाही किंचित् !
आज उगीचच नयनिं आणितो सजल चांदणें
गालावरचा निंबसुगंधित रंग
आणि लावितो मनीं हवीशी आग

# शरदामधली चांदरात

शरदामधली थंडी नाजुक दंतव्रण करणारी
त्यांतच ज्योत्स्ना निळी मुलायम ओढ लाविते गहिरी
तो रस्ता ती बूचफुलांची हळवी गंधित आण
वटवृक्षांची हिरवी-पिवळी वरती भव्य कमान

रातराणिची लाडिक नीरव ठुमरी वातावरणीं
धूप धुक्याचा उगीच फिरतो रानीं उन्मन बनुनी
पानापानांतुनी रेखिते छाया काळी नक्षी
दूर टेकडीवरी केशरी एकच दीपक साक्षी

आपण दोघें, तिज्या कुणाची नव्हती जाण मनास
वेढित होते बोलण्यांतले नकळत कसले पाश
आणि चालतां विरघळली कीं जाणिव शरद् ऋतूंत
कुणास ठावें कैसे जुळले थरथरणारे हात

क्षणानेच परि कळे एकटी उरलें मार्गावरती
धूसर झाली दृष्टि—धूसर झालें अवतीभवती
खरेंच सारें ?—की शरदांतिल चांदरात ही न्यारी
ध्यासामधुनी भास हवेसे हृदया दाखविणारी !

## फूल जुईचें

घडलें तें तर होतें किंचित्
श्रावणांतलें फूल जुईचें,
स्वता भिजोनी निज गंधाने
स्वरूप दे मज ओलेतीचें.

अजुनि निथळतें उभी सुगंधा
ऊन पिउनियां दोन तपांचें;
ओल्या अंगांगावरि फुलवित
श्रावणांतलें फूल जुईचें !

## तोल सुटावा

तोल सुटावा म्हणसी तूं, पण कसा सुटावा ?
ठाउक असतां खाली पोकळ पोकळ सारें;
रिता कुंभ जणु चमचमणारा,
शब्दांनी केवळ रितेपणीं घुमणारा, निनादणारा
ऐकुनियां तें बर्फच होतें पाउल;
तोल सुटावा म्हणसी तूं पण
कसा सुटावा ?
तोल सुटाया हवें मातिचें त्या आकर्षण
जिच्या अंतरीं जळता लाव्हा प्रीतिरसाचा
आणिक उदरीं अनंत खाणी
सोन्याच्या रत्नांच्या;
तिथेच सुटतो तोल मनाचा
मनाचाच कां, गगनाचाहि.

# किती दिसापासुनीया

किती दिसापासुनीया
मना लागुनी असोशी
झेपावते ही पाकोळी
डोळे लावुनी आकाशीं

कोण जाणे केव्हा तेथे
तिला दिसलें ग फूल;
तडफडे, फडफडे
घेउनीया त्याचें खूळ

किती दिस मी बुझावूं ?
पंख पंख गळतात;
दूर पळतें आकाश
आला संपत वसंत.

## क्रूस

एकांताच्या कृष्ण शिलेवर
कुणी चालवी छिन्नी संतत :
घाव संथ अन् लयींत एका;
खिन्न मनाला तिचीच सोबत

जरा थांबते छिन्नी आणिक
नजर सरावे अंधाराला;
उभा कोरिला क्रूस दिसे अन्
मूर्तिमंत 'मी' लटकें त्याला

खिळे ठोकितो हात कुणाचा—
तो तर माझा...माझा कृश कर;
डोळे मिटुनी मी पुटपुटतें,
"अजाण तो त्या प्रभो क्षमा कर !"

# स्वप्न तेंच का फुलतें आहे ?

आजवरी जें वांछित होतें
स्वप्न तेंच का फुलतें आहे ?
शीळ घालुनी मला खुणेची
निळया नभामधि झुलतें आहे.

रंग चोरुनी तारुण्याचा
स्वतालाच का भुलतें आहे ?
गीत गाउनी धुंद दिवाणें
भुलवाया मज झटतें आहे.

डोळ्यांतुनि मृदु भाव शिंपडित
उगीच का रिमझिमतें आहे ?
श्रावणांतल्या सजल उन्हासम
मजसमोर चमचमतें आहे.

नकळतांच मी त्याच्याभवती
पाश रेशमी विणितें आहें;
विणतां विणतां रेशमांतली
वीज मनीं झिणझिणते आहे.

# मजला तूं

मजला तूं, तुजला मी:
जन्माची ही सोबत;
जाऊं खंबीर मनें
धरुनी हातांत हात.

निश्चय हा करुनि मनीं
दुःखा, तुज चालविलें;
ना यावा शीण तुला
म्हणुनि शिरीं मिरवियलें.

तरिही रे तूं दमसी,
टाकिसि ना पुढती पद;
अर्धांही पथ न सरे
सोडिलीस मम संगत.

जायचें अजून किती ?
परि तुजविण पद दुबळे;
कुंतीने दुःखच कां
मागितलें—आज कळे.

# हें नव्हतें मज बोलायाचें

हें नव्हतें मज बोलायाचें :
लपाछपीचें अढीकुढीचें;
हें नव्हतें मज ऐकायाचें :
तेढेंवेडें अटीतटीचें !

मुळीच नव्हतें दावायाचें
हिरवट कडवट कांही वदनीं;
बघायची तर कधीच नव्हती
अशी जिव्हाळी तुझिया नयनीं.

योजिलीच मीं नव्हती असली
जीवतुटीची भेट अघोरी;
मनांतलें सुख राहि मनीं अन्
दुःखहि बसलें होउनि चोरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 33723 वि:
क्रमांक 7356 नों दि

## मी इथली

मी इथली, मी इथली,
नाही मी कुणि परकी;
सखि राधे, कां बघसी ?
नाही मी अनोळखी.
माहेर न सासर वा,
नाही गणगोत मला;
तुझियासम येथलाच—
येथलाच मजसि लळा.
रूपहीन, गंधहीन
मी साधी, मी भोळी;
यमुनातटिं रुजलेली;
त्याच्या पदिं तुमच्या पदिं
पसरुनि तनु मखमाली
पायघड्या मी झालें.
हृदयावर या माझ्या
मीलन तुमचें ठसलें.
तुजसम त्या स्पर्शाचें
चंदन मीही ल्यालें.
तुमच्या या कूजितांत
एक मुका स्वर माझा,
अन् माझ्या कणकणांत
व्यथित मधुर कंप तुझा.

ऐकत मी मुरलीरव
तुझियास्तव झुरणारा,
गोपास्तव गाईस्तव
रमणारा घुमणारा,
कुब्जेसाठीहि कधी
अपरात्रीं द्रवणारा;
प्राशित तो मुरलीरव,
जो नाही माझ्यास्तव;
चुंबित तीं पदकमळें
जीं वळलीं नच कधीच
यमुनातटिं माझ्यास्तव
त्यांनाही ना कळतां
धरितें मी हृदयावर,
अन् क्षणभर, शीतलता
देउनियां त्या चरणां
मी फुलतें, मी झुलतें
अन् धजतें म्हणावया :
मी त्याची कायमची,
यमुनातटिं रुजलेली
हिरवळ मी, हरिमय मी;
मी इथली, हो इथली !

# आषाढाच्या घनांबरोबर

आषाढाच्या घनांबरोबर
मनांत घुमतें पिसें अनावर,
ओढ लावुनी उगिच कुणाची
हिरवें-काळें करितें अंतर.

तशांत अजुनी वसंतांतले
कोकिलरव हृदयांत दाटले,
ग्रीष्मामधला वळिव हवासा
अंगांगावर अजुनि हुळहुळे.

आषाढाच्या मत्त सरींनी
पिसापिसांतुनि पिसें उतटतें,
घुमुनि घुमुनि घरच्यांत पाखरू
एकलेंच हें निपचित पडतें.

## तलम रुपेरी पंख

सलम रुपेरी पंख फुलारुन
बसे धुक्याची पक्षिण हळवी
उबवित अंडीं तृप्त मनाने
गिरिशिखरांचीं निळसर हिरवीं

क्षितिजाआडुनि तोच कुणाचा
निरोप येई केशर चर्चुन;
चळली बैठक, आठवला जणु
तो सोनेरी संकेतक्षण.

दिशादिशांनी केली कुजबुज,
हसला वारा डोळे उडवुन;
नभीं उडाली पक्षिण चंचल
क्षणांत हिरवे धागे तोडुन !

# ये फाल्गुन

ये फाल्गुन, मोत्यांच्या
चुरम्याची स्वप्नकोर.
आणि अंगणांत कळी
मोगरिची ही टपोर.

ये फाल्गुन, ओलांडित
काळ, कुठे मज नेई :
मोगरिच्या गंधांतुनि,
सनईच्या स्वरवलयीं.

तीं गंधित स्वरवलयें!
वलयांतच फाग फिरे;
स्वप्नकोर जाइ तळीं
वरती भवरे भवरे!

# वृथाच स्मरतें

वृथाच स्मरतें कौतुकभिजलें
वाक्य फुलांचें एक कोवळें,
नजरेमधलें गुलाबपाणी
अन् नवनीतहि वर्तनांतलें;

वृथाच स्मरतें अलिप्ततेंतिल
सुई आणखी बोच तियेची
आणि तिने विणिलीं हृदयावर
फुलें रेशमी जीं जखमांचीं !

# उरलें मी तेवढीच

जाऊं दे ना कधीच
एकही तडा घटास;
यमुनेला जातें मी
टाळित त्या मधुवनास.

इथुनि तिथुनि नेम धरुनि
येत खडा परि अचूक;
चुकवुं किती ? आणि कशी ?
नकळतांच जात झोक.

डुचमळतें, झरतें जळ
भिजवित मम अंग अंग;
खिळते बघ लाख नजर
अन् तूं बघसी निसंग.

राहो घट तरि अभंग...
आळवणी एवढीच;
ज्याचा घट त्याच्यास्तव
उरलें मी तेवढीच !

## एक क्षणाचा पक्षी

अवचित येतो एक क्षणाचा पक्षी
तव स्पर्शाचे पंख पसरुनी निळे अनावर,
घेउनियां निज तृषार्त चोचिंत
गंधित दाहक कांही,
झापुनि बसुनी असा मनगटीं
बोलाया जणु पाही.
आणिक हलतां जरा पापणी माझी
भुरकन् जातो उडून वेडा,
जातां जातां दंश करुनियां
करांगुलीवर एकच नाजुक.
अन् ही स्नेहल अनिद्र रजनी
जाते शिणुनी त्या दंशावर
शीतल फुंकर घालघालतां !

# माझें दुःख आलें घरा

वामनाच्या पावलांनी
माझें दुःख आलें घरा,
घाला सौभाग्याचे हेळ
सोनकेळ लावा दारा.

त्याच्यासाठी रात्रंदिन
दीप ठेविला जळत;
आसवांनी भरलेलें
सिद्ध ठेवियलें पात्र.

माझ्या चुकल्या पाखरा
नका नांवगाव पुसूं;
आहे अभिमान वेडा
परतेल रुसूं रुसूं.

त्याच्या मौनांत जिव्हाळा,
येत्या पायीं वरदान;
डोळां कितीक जन्मांच्या
ओळखीची स्निग्ध खूण

सुखा ! दाराआडुनीया
छेड वसंतबहार;
त्याच्या पावलाखालती
शेला स्वरांचा पसर.

माझ्या मिटल्या कळ्यांनो !
उघडा ग चोरखण
माझ्या दुःखाच्या चरणीं
अर्पा अपुलालें धन.

राहो क्षण, राहो युगें
तयाची ना चिंता मना;
माझें म्हणवीत आलें
हीच आनंदवेदना !

मराठी ... संग्रहालय ठाणे
९२८४६

# पुरे

पुरे ! दुखलीं ना बोटें,
झणाणली तार तार;
पिळवटून उठली
जीर्ण मनाची सतार.

निजलेले सप्त सूर
चमकून झाले जागे;
नव्या अज्ञात गीताचे
विणूं लागले ना धागे.

वीज तानांची चपळ,
राग अनाम अबोध,
आणि चढत्या लयीचें
भोती वादळ हो धुंद.

तुझ्या सराईत बोटा
साधे वादळांत लय;
माझ्या नवख्या अंतरीं
दाटे विलयाचें भय.

कशी साधायची सम ?
कशी सांभाळूं मी साथ ?
कळ नाजुक स्वरांची
जर उतटे बोटांत ?

# स्वप्नांनो !

स्वप्नांनो, येउं नका
संगतिं जर तो नसेल,
त्याविण ही गुंफुं नका
स्मरणांची बकुळमाळ;

स्वप्नांनो ! दावुं नका
तो वसंत, ती हिरवळ,
जर नसेल त्यांसह रे
नित परिचित ती चाहुल;

ऐकवूं नका मुळीच
पर्णांची मधु कुजबुज,
थरथरत्या हातांचें
जर नसेल त्यांत गूज;

स्वप्नांनो ! दावुं नका
या सशब्द चित्रकथा
गंधगर्भ मौनांतिल
नसतिल जर त्यांत व्यथा;

स्वप्नांनो ! यायचेंच
तर या हो बनुनि तोच;
ना तरि जा, जा खुशाल
लोटुनि मज तिमिरांतच.

# मौन तुझें

मौन तुझें
गंधगर्भ वासंतिक रात्रींतिल गगनासम
यौवनवर मज देतें,
स्वप्नमाळ देउनि करिं, भूमिसुता बनवुनियां
त्या विदेह मंडपांत पुनरपि मज पाठवितें;
वनवासा नेउनियां कांचनमृग दाखवितें,
बोरेंही चाखवितें;
पुष्पकांत बसवुनि मज इंद्रधनूंतुनि नेतें;
शरदांतिल पुनवेपरि स्मरणपटा उलगडतें;
गूढ विकट छायांतुनि वन अशोक दाखवितें;
रजकाचे बोल कधी ऐकवुनी
भूमीच्या उदरामधि मज चिणितें मौन तुझें;
शरयूसम "या हृदयीं निज अपार दुःखासह
तळमळतो अजुनि राम सीतेस्तव"
मज कथितें; आणिक तें ऐकुनियां
धरणीची कूस बळें उसवुनियां
पुनरपि तें रामायण रचिण्यास्तव
मी सदैव तगमगतें;
अन् बुडतें तव अथांग मौनांतच, मौनांतच !

# असे असीमाचे ओठ

आणि अकल्पित कळे
तुझ्या दृष्टीलाहि ओठ,
मत्त कटाक्ष स्पर्शतां
जाणिवेस येते झीट.

सागराच्या ओठांतला
तुझ्या शब्दां ये आवेग,
मुद्रा ठसवितां मनीं
पेटे अमृताची आग.

रविबिंबांतून स्पर्शे
तुझें अधरवर्तुळ;
नारीपणावर माझ्या
फुले सार्थकाचें फूल.

होतें पौर्णिमाच केव्हा
अनावर तुझें मुख;
दिशादिशांतून वाहे
उधाणत प्रेमसुख.

अलौकिका ! स्नेहा ! तुला
असे असीमाचे ओठ;
आणि मीहि सदा अशी
भरलेली काठोकाठ !

## रितेपण

आलें मनाच्या आकाशा
एकाएकी रितेपण,
एक तेजोगोल गेला
रविचंद्रांना पुसून.

एका क्षणांत पटली
त्याशीं युगांची ओळख;
जन्मोजन्मींची तुटली
जोडलेली जवळीक.

त्याच्या पावलांत लाख
उजळले धूमकेतु;
एका स्पर्शांत तयाने
फुलविले साही ऋतु.

तेजोगोल होई लुप्त
खेळ क्षणाचा खेळून;
दान सर्वस्वाचें घेई
वेडया आकाशाकडून.

आता नभा रितेपण
असूनिही रविचंद्र;
पिंगा घालितें—घुमतें—
रिती फुंकीत घागर !

## दुःख हवें

‘दुःख हवें’ जपत मंत्र
वेडे कुणि तप करिती,
दुःखास्तव प्रभुपायीं
सत्याग्रह आचरिती.

हो प्रसन्न प्रभु बोले,
“मागा हो इच्छित वर.
भोगा सुख नंदनिंचें,
व्हा जगतीं अजरामर!”

वेडे ते हसुनि वदति,
“मोह न तो या खुळ्यांस.
दुःख हवें, दुःख हवें—
दुःखाचा हृदयिं ध्यास”

“जा—तथास्तु! दुःख दिलें!”
बोले प्रभु, “सांगा परि
दुःख हवें तरि कसलें?”
अन् वेडे पुटपुटले.

“दुःख नको या टिचभर हृदयाचें!
दुःख नको ओंजळभर प्रीतीचें;
दुःख नको भिंतींतच उबणारें;
दुःख नको खुजट कुबट
छपरांतच दबणारें!

दुःख नको नृपमंदिरिं रमणारें
दुःख नको ऊर्वशिच्या नूपुरांत घुमणारें.

दुःख असें घ्या विशाल
घेइल जें निज कवेंत
क्षितिजासह हें वर्तुळ !
दुःख हवें गरुडाचें गर्वोद्धत
मातेच्या मुक्तीस्तव
आणिल जें जगिं अमृत !
दुःख हवें उंच असें
नमविल जें हिमनगास,
वाकवूनी त्या नभास
वाहवील अश्रूंची
भागीरथि पुण्यमयी
तारिल जी कोट्यवधि
या शापित सगरसुतां !
दुःख हवें हें असलें
संजीवक अन् समर्थ !
प्रभु ! अपुल्या हास्यासम
करुणामय दुःख हवें !"

हसुनि म्हणे प्रभु, "तथास्तु !"
अन् तेव्हापासुनिया
दुःखहि तें होइ अमर;
आणिक निज वेडासह
मृत्युंजय आले जागीं
ते वेडे क्रांतिवीर
ते वेडे क्रांतिवीर !

## ठाउक मज

ठाउक मज बघशिल ना
मम पुष्पें तूं कधीच
तरिही तव पथिं करितें
मी त्यांचा संतत खच.

इतरांच्या शिरिं वसणें
वा मालेमधि झुलणें
याहुनिही मरण बरें
तव चरणाखालतीच.

# ये ज्येष्ठ पौर्णिमा

ये ज्येष्ठ पौर्णिमा न्हालेली हिमगौर
केसावर ओल्या शुभ्र जुईचे हार
नव तृणांकुरांचें वसन नेसली हिरवें
गुल्मोहर रंगवि नाजुक गोरे तळवे

साहित्य पुजेचें डाव्या हातावरती
सावरीत ओचे हळूच उजव्या हातीं
वटपूजेस्तवही सुवासिनीसह चाले
सश्रद्ध लोचनीं स्वप्न तरळतें कसलें.

नववधू लाजऱ्या स्मरती तें 'स्मरहास्य'
ती अधिरी कुजबुज, धुंद सुगंधित स्पर्श
आठवून होती अधर विलग क्षणमात्र
मनिं पहिलीवहिली खुले रसेली रात्र

पुटपुटती गुरुजी मंत्र सांगुनी तंत्र
किणकिणत हालती सालंकृत करयंत्रें
जुळवून हात विनविती वडाला युवती
"दे जन्मोजन्मीं हाच पती सावित्री."

पतिनाम जपे पौर्णिमा मिटोनी डोळे
प्रार्थना वदाया ओष्ठद्वयही हाले
"दे जन्मोजन्मीं हाच—" जीभ अडखळली
मनिं शशिविण प्रतिमा दुज्याचीच थरथरली

आठवे शुक्र हो तापस कोणासाठी
तो सहस्रकर ती दाहक मोहक दृष्टी
"रे ! पुढल्या जन्मीं—" सांगितलें त्या स्मरलें
भयकंपित मन हो जुळलेले कर गळले

साश्चर्य जाहल्या सख्या खुणावुनि बघती
गोंधळली राका करी प्रार्थना पुरती
परि वृद्ध जाणता वट हृदयीं कळवळला
करुणाश्रु एक पुनवेच्या शिरिं ओघळला !

# मी अंधार होऊन लपलें होतें

मी अंधार होऊन लपलें होतें
दऱ्यांत, खोऱ्यांत, गुहागुंफांत
झाडावेलींच्या कुंजाकुंजांत
माझें अंधारपण संरक्षीत.

मी वाळू होऊन दडलें होतें
नदींत, सरोवरांत
सागराच्या अथांग सखोलतेंत
माझें लहानपण जपून ठेवीत.

मी पाचोळा होऊन विखुरलें होतें
रानावनांत, धुळींत
एकांतांत बसलेल्या वृक्षांच्या मुळाजवळ
माझें पिवळेपण लपवीत.

तूं आलास—माझ्या कणाएवढ्या मीपणावर
न्याहाळणाऱ्या
आर्द्र नजरेंतून
समर्पण शिंपडीत थबकलास.

आता अंधार चांदण्यांनी लहरतो आहे
वाळूवर मोत्यांचें पाणी चढतें आहे
पाचोळ्याच्या पिवळ्या शिरांत
हिरवी कळ तटतटले आहे
मला भीति वाटते आहे.

म्हणून मी पुन्हा अंधार होऊन लपतें आहें
तुझ्या डोळ्यांत, तुझ्या मनांत
माझ्यापासून तुझें संरक्षण
करण्यासाठी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 33773 वि: ...
क्रमांक 9544 नों दि

# आठवते ती गती अनावर

आठवते ती गती अनावर
आठवते हळवी अगतिकता
रिमझिमणारा चंद्र नभींचा
शेजारिल स्नेहल दाहकता

हात पोळला स्मरे आणखी
चंद्र नभींचा उतरे हृदयीं
आणि पोळल्या करा मिळाली
असह्य कसली अमृतग्वाही.

## कालनदीवर

शिशिर पीत कुणि उभी कधीची कालनदीवर
हिमवंती ही, वसन हिमाचें शुभ्र तनूवर;
ओठावरती गारठलेले सोनेरी स्वर;
मूक तपस्या बघती निश्चल वठले तरुवर.

भग्न घटाचे तुकडे तुकडे घाटावरती;
वृद्ध वाकडा कदंब झुकला काठावरती;
आणि तयावर एक फाटकीचिटकी चुनडी
कथा व्यथांची कवळुनि हृदयीं बसली वेडी.

भणभणणारा भटक्या वारा भटके विवळे;
वंशवनामधि वेळू उरले अबोल पिवळे;
भास युगांचे लाटांवरती बसले गोठुन;
ध्यास मनांचे काठावरती उभे ताठरुन.

ठसलीं साडेतीन पावलें वाळूवरती;
मुकुटामधलीं मोरपिसेंही थिजलीं दिसती;
शिशिराचा विषपेला भरला काठोकाठ—
पितेच गौळण जरी हिमाने जळती ओठ.

घोटाघोटासवें आळवित सारीं स्मरणें
क्षणाक्षणाला करी सचेतन भोगित मरणें.
आणि अचानक ऋतुचक्रा ये गती अनावर.
जळत्या ओठीं घुमति वसंतीं सोनेरी स्वर.

वंशवनांतिल वेळूंची ही क्षणांत मुरली;
मोरपिसांसह हिरवी चुनडी खुलली झुलली;
भग्न घटाचे तुकडे जुळती त्या घाटावर
पुन्हा युगयुगीं गोकुळ हसतें कालनदीवर.

## सुख

सुख वेंघितें आकाशा—
आता मोजमाप कैचें ?
हात अपुरे दिशांचे.

अमृतातें जिंकी पैजा
अशी अक्षरां ये गोडी;
आता नवरसां कोडीं.

रवि-शशांकांचे कर
स्पर्शसुखीं झाले थिटे;
जेव्हा दिठीं दीठ भेटे.

लाजे कल्पसुम ऐसें
कांही परिमळे मनीं
आज अदेहमीलनीं

सुख सनाम सनाथ—
उचलितां तूं निर्माल्य
मनीं प्रगटे कैवल्य !

## एक क्षण येतो

हेमंतांतल्या सायंकाळसारखा, धूसर, सुगंधित,
रात्रींत विरण्यासाठी उत्सुक झालेला
असाहि एक क्षण येतो—अवचित
तूं माझ्याजवळ असतांना,
मी असतें दूर दूर
तुझ्यांतल्या त्या अज्ञात मार्ग तुडविणाऱ्या
भटक्या कलंदराला शोधीत;
तूं जवळ बसून कुजबुजतोस,
मोहराच्या सुगंधासारखे तुझे शब्द
सांडत असतात अवतीभवती
पण माझे कान असतात दूर दूर,
तुझ्या अवाक् शक्तीच्या
अनंतांतल्या मौनाशीं चाललेल्या
रसमय गुजगोष्टी ऐकत, मुरलीवेड्या राधेसारखे.
तूं जवळ बसून पाहतोस माझ्याकडे
आषाढमेघांच्या धुंद डोळयांनी;
मी पाहत असतें—पाहत नसतेंहि :
माझी दृष्टि खिळलेली असते
तुझ्या त्या डोळयांवर, जे एकाच कटाक्षाने
आपल्यांतलें दुजेपण नाहीसें करीत असतात.
वसंतवाऱ्याच्या सामर्थ्यवान् बाहूसारखा
तूं विळखा घालतोस माझ्याभोवती;

पण मी कधीच निसटून गेलेली असतें दूर दूर
तुझ्या त्या बाहूंकडे, जे मला झटकून टाकून
झेपावत असतात गरुडासारखे उंच उंच
कांहीसें अप्राप्य मिळवण्यासाठी !
...आणि तूं जवळ असतांनाहि
नसावाससा भास होतो !
की नसतोसच तूंहि ?
मग तो धूसर, सुगंधित, मीलनोत्सुक क्षण
जिरून जातो स्वतःतच...
उसासत जळणाऱ्या अभोगी कापुरासारखा !

# पूल

तुझ्या नि माझ्यामधे दरी ही
ठाउक तुजला आणि मला;
पूल तियेवर बांधायाचा
हट्ट वृथा तरि चालविला

मौनसुगंधित तुझी कलाबुत
रेशिम माझें दवभिजलें :
झुलता करूं या पूल अलौकिक
म्हणुनी धागे गुंफियले.

विणितां विणिलीं तयांत स्वप्नें
आणिक पुष्पें लाल-निळीं,
तऱ्हेतऱ्हेचीं शुभ्र पाखरें
किलबिलणारीं मनांतलीं.

चंद्रकरांसम पूल जाहला
फूलपरीचा जणु शेला;
स्पर्शच झाला कातर बघुनी
त्या अद्भुत सौंदर्याला.

धजें न पाउल टाकाया मी,
तूंहि उभा थबकून तिथे;
तलम धुक्यासम पूल झुले वरि
दरी खालती खदखदते.

दो क्षितिजांवर खिळलों आपण
परत अता जाणें नाही;
अलौकिकाला शापच असला
मीलनपथ हा चिरविरही.

## मूळ

मला मूळ घेऊन आली आहे
वळिवाने न्हालेली अनुभवी धरणी गंधमादना !
मोगऱ्याच्या उन्मत्त फुलांखाली
तुझा नजराणा झाकून घेऊन,
भिजलेल्या रस्त्याच्या काळ्या रेशमी
पायघड्या पसरीत,
संध्येची किनखापी अब्दागीर घेऊन
आली आहे गंधवती माझ्या दाराशीं
उंबरठा ओलांडून मी निघालें आहें—
कळेल का तुला ?
मी निघालें आहें.

# तिथेंच तर

तिथेच तर ही रात्र थबकली
रिता भरित घट चंद्ररसाचा;
बघतां बघतां माळ जाहला
डोह रुपेरी पायतळींचा.

तिथेच तर तूं म्हटलें होतें,
"आज पौर्णिमा समूर्त झाली."
चढलें पाणी—अन् तंद्रीची
नाव रुपेरी डुलूं लागली.

"भविष्य सांगूं?" म्हणून धरिला
हात, आणि हो—नेला ओठीं;
भूत-भविष्यें क्षणांत गेलीं
जळ भरण्या त्या डोहाकाठीं.

—हो तिथेच पण विसरलास तूं...
कुणा बोलवूं साक्षीसाठी ?
भूत-भाविसह रातहि माझी
रेंगाळे त्या डोहाकाठीं.

# आडोसा

एकदाच पाहिलें मीं वादळ
तुझ्या डोळ्यांत, चेहऱ्याच्या रेषारेषांत
चुकलेपणाचें—सारेच अंदाज हुकलेपणाचें,
कांहीसें अमोल हरपल्याचें,
फुलणारे कळे करपल्याचें;
एका पावसाळी दिवशीं
संध्येचें सोनकमळ उमलत असतांना
जेव्हा तूं विचारलेंस, "तूं येशील का ?"
म्हणायचें होतें तुला दुसरेंच कांही;
पण तूं केलास आडोसा या साध्या वाक्याचा.
प्रत्येकाच्या मनांतला लहानसा बुद्ध
आपल्या लहानशा जगांत मागत फिरतो ना
सर्वस्वाचें दान ?—तसलेच सूर थरथरत होते
त्या हळव्या प्रश्नांत
आणि मीं हलवली मान निश्चित नकाराची.
न दिसणारा पाऊस झडला तुझ्या पापण्यांत;
दुखावलेला अहंकार
घुसमटला मौनावलेल्या ओठांत;
तरिही मनांतली वीज गिळून टाकीत
संथ पावलांनी तूं गेलास
मलाच दान देऊन डोळ्यांतल्या वादळाचें;
—तोहि एक आडोसाच.

त्या दिवशीं माझें व्रत मोडलें,
घड टाकलेल्या केळीसारखें मोडूनहि कृतार्थ झालें.
कारण संस्कारांचें जीर्ण एकुलतें वस्त्र
मीं देऊन टाकलें होतें
सर्वस्वाचें दान मागणाऱ्या
तुझ्यांतल्या समर्थ, अंगुष्ठमात्र भिक्षेकऱ्याला.
देण्यासारखें होतें तेंहि देऊन टाकलें होतें
त्या लक्तरांबरोबर;
न देण्यासारखें होतें, तें मात्र ठेवलें
निश्चित नकाराच्या आडोशाआड.
तूं गेलास— ! पण जातांना असें पाहिलेंस
किं...
की आडोशाआड उभी राहून मी ढाळतें आहें
कृतज्ञतेचे अश्रू
प्रतिदिवशीं—संध्येचें सोनकमळ
हळूहळू मिटतांना !

# ढग दाटती

ढग दाटती दाटती
शंकाकुशंकांचे मनीं;
मात्र लवते डोळ्यांत
वीज आशेची देखणी.

चिंब भिजतें भिजतें
मनच्याच पावसानें;
उभी पेटतें पेटतें
डोळ्यामधल्या विजेनें.

## भर दिवसाहि कधी

भर दिवसाहि कधी
एक अलौकिक रात
लाख तारांचा आहेर
येते घेऊन करांत.

कधी दुपारच्या तीरीं
रात लपाछपी खेळे;
दक्ष दिसाच्या उराचे
कांही चुकविते टोले

झळांतून येई कधी
रात-जुईचा सुवास;
मंद गंधांत कोंडतो
उभ्या दिवसाचा श्वास.

दिस कासाविस स्तब्ध,
धुंद रात्रींतलें मौन;
बोटमिठींत क्षणाच्या
घेतें युगांचें बोलून.

येतें अवचित वरी
वेदनेचें चंद्रबिंब;
ऐन दुपार भिजते
चांदण्यांत ओलीचिंब.

भर दिवसा उन्हांत
मृगजळ माझी रात;
उभी वाळूंत मी तृप्त
तिचा घोट घोट घेत.

# दर्शनबधिरा

तूं यायचास म्हणुनी
सदनिं लावितें स्वप्नांचे झुळझुळते पडदे
रेखुनि त्यावर चित्रें
हिमालयाचीं, कुजबुजत्या सागरलाटांचीं.
घडयाळासही बजावितें की
नको वाजवूं पाउल टकटक, थांब जरासा.
गुंफित गंधित पुष्पें स्मरणांचीं मौनांचीं.
आणिक येतां चंद्र दिव्यामधि
विरल शुभ्र घन असा पसरितें हळू तयावर
फक्त दिसावा तुझा चेहरा;
अन् मी होतें संध्या मीलनअधिरा :
करांत घेउन गुच्छ जुईचा दिसेनसेसा
मीलनअधिरा.

तूं येउन गेल्यावर
विरती पडदे
फरफटतें काळाचें पाउल,
चंद्र दिव्यांतुनि जातो निसटुन;
उरतें फक्त निळें तम भवती,
अनाघ्रात तो गुच्छ जुईचा
अन् मी दर्शनबधिरा—
केवळ दर्शनबधिरा

## मीलनवेळा

संध्येच्या आरक्त लोचनीं आर्त
लागलें यावया तारांचें दव;
सोनेरी सुगंधी लावून दिवे
सोनचाफा उभा स्वागतास्तव.

जाहला हळवा सोपान जरा :
लागायाचे आज पुन्हा ते पाय;
दारही उत्सुक, निःशब्द उभें
प्रतीक्षेंत काय लावून लय ?

घंटिका वीजेची मुकीच झाली :
स्पर्श त्या बोटांचा आठवे तिला;
आठवे देहाची होऊन वीणा
छेडिली प्रमत्त स्वरांची माला.

स्मरून शब्दांचा श्रावणराग;
गर्द हो भिंतींचा हिरवा रंग;
आणि या दीपाच्या नेत्रांत स्वप्नें
युगांची तपस्या व्हायची सांग.

सारी हो सिद्धता, सारेंच आतूर;
मी मात्र उभीच होऊन शिळा
दाटलें शंकांचें काहूर...आजहि
टळायची काय मीलनवेळा ?

# अवेळस्वप्ना !

अवेळस्वप्ना या तंद्रींतिल
नीलनगरच्या राजकुमारा !
तटाआडच्या महालांत मी
उभी अशी चुकवीत पहारा.

ती संध्या—तूं फेकिलेंस सुम
राजपथाची दृष्टी चुकवुन;
हरिलें शैशव त्या कुसुमाने
आणि अर्पिलें हें चिरयौवन.
तेव्हापासुन ढासळती तट,
दयार्द्र हो जाईची जाळी;
तेव्हापासुन तोडुन पैंजण
येत इथे मी अशी अवेळीं.

इच्छित 'टाप' न ये परि अजुनी
—का ऊरच कानांत धडधडे ?
गस्त पुन्हा येईल प्रियतमा,
पहाटचे झडतील चौघडे.

त्याआंतच ये अवेळस्वप्ना !
नीलनगरच्या राजकुमारा !
तटाआडच्या महालांत मी
उभी असें चुकवीत पहारा !

# अशी अकल्पित

अशी अकल्पित कशी स्वप्नजा
आली तुझिया घरा,
तळहातावरि ठेवुनि गेली
या जळत्या कापुरा.

"प्रकाशमय तव होइल जीवन"
देउन गेली वर;
म्हणे, "अखेरीं अपार्थिवाचें
दिसेल तुज मंदिर."

अधरीं स्मित अन् तळहातावरि
कापुर हा पेटता;
असेंच तुजला पुढे जायचें
उजळित उरल्या पथा.

पडेल जर का पाउल थोडें
इकडे वा पलिकडे,
झाडाझाडावरुनी झडतिल
निंदेचे चौघडे.

शिलाशिलांतुनि शाप सर्पसे
फूत्कारित उठतिल;
तपातपांच्या पुण्याईला
गिळावया बघतिल.

तसूतसूवर उभे धर्म हे
तुला द्यावया सुळीं,
मध्येच जर का तळहातींची
विझेल कर्पुरकळी.

हें ज्योतीचें बाण उग्रतर
सतिच्या बाणाहुनी;
हा भक्तीचा बाण तीक्ष्णतर
रतिच्या बाणाहुनी.

कणाकणाने जळत जाउं दे
देहहि दुबळा असा;
क्षणाक्षणांची शिंपित शांती
पूर्ण होउं दे वसा.

अशी अकल्पित कशी स्वप्नजा
आली तुझिया घरा,
तळहातावरि ठेवुन गेली
या जळत्या कापुरा !

# आठवतें आठवतें

आठवतें आठवतें
काळोखाच्या गूढ डोहीं,
स्वप्नांतल्या गोपुरांत
ज्योत उजळत राही.

आठवतें, गोपुराला
जावयाला वाट नाही;
काळोखाच्या डोहाला या
काठ नाही, घाट नाही.

आठवती, उतलेले
मनांतले रात्रिंचर;
आठवतें उमटलें
गोपुरांत मंत्राक्षर

आठवतें, भोवतीची
रात संपणारी नाही;
गोपुरांत पेटलेली
ज्योत विझणारी नाही.

आठवतें—पायांनाहि
पंख फुटायचा आहे;
अखेरीस ज्योतीमध्ये
प्राण मिटायचा आहे.

## ती सकाळ सावध

ती सकाळ सावध, सावध तप्त दुपार,
सावरी तोल ही सांज जरी आतूर;
ती सावध ओळख : ओठ घट्ट मिटलेले,
सांगेन तेंच मी बघती सावध डोळे.

बसवून भोवती सावध असा पहारा
बेफिकीर फिरतें दाखवीत निज तोरा;
परि क्षणैक केव्हा सावधता पेंगुळतां
अन् नजर असावध क्षणैक चळतां ढळतां,

तूं अचुक शोधिसी बेसावध क्षणाला
विंधिसी सहज की लावुनि प्राण पणाला;
अंगांगीं भिनते दृष्टि तुझी, तव शब्द,
विष चढतें—चढतें करित जिवा बेबंद.

अनिरुद्ध क्षणीं त्या फुलतें स्वप्न उषेचें
होतात पहारे निष्फळ सावधतेचे.

मराठी ग्रंथ ... ठाणे
33983
...15646... नों: दि: ...

## नको नको ना

नको नको ना वेढुं असा मज श्रावण होउन;
साहतें न मज नयनांतिल हें गर्द निळेंपण;
साहतें न हें तृणपात्यांचें ताठर स्पंदन;
मत्त गंध या प्राजक्ताचा साहतो न मज;
साहते न मज सोनसरींची लाडिक कुजबुज.
अजुनि न गेली हृदयावरची शिशिरसावली,
वसंतवर्षेचीही किमया निरर्थ झाली;
असेंच असुं दे निरभ्र हिममय हें माझें मन :
नको पुन्हा तो सौंदर्याचा ध्यास नि श्रावण !

## डोळयांत प्रतीक्षा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ वि: ......
क्रमांक ........................ नों: दि: ..

डोळयांत प्रतीक्षा, अधरीं जळे तहान;
हा दिवस कधीचा पथीं उभा बेभान,
धडधडे चौघडा; ये मेघाची स्वारी,
मधुनीच विजेचा फडके ध्वज सोनेरी;

दशदिशा जाहल्या आदबींत निःशब्द,
स्वागता उभे तरु होडनियां करबद्ध;
फुलवीत पिसारा नाचुं लागले मोर,
दिन उभा कडेला मनांत शंकित चूर.

रथ आला, आला चाललाहि जवळून;
दिन हळूच पाही नेत्र वरी उचलून.
"मीं वाट पाहिली" वदे अखेरीं दुबळा;
"तूं कोण ? दूर हो." रथ निघुनीयां गेला.

क्षण उपचारांचें इंद्रधनू त्या ओठीं
चमकून लोपलें कळे न कोणासाठी;
ना ओळख पुसटहि—उपेक्षाच ये हातीं
अन् उंच उडाली तप्त कोरडी माती.

ती धूळ तापली कवळुन भरल्या हृदयीं
दिन कोसळला तो काळोखाच्या डोहीं.

# आरशांत बघतां मी

आरशांत बघतां मी
बिंब दिसे मज परकें :
त्रस्त कुणा प्रौढेचें,
अन् डोळे मिटतें मी
खिन्नपणे.
त्या मिटल्या डोळ्यांना
एक दिसे स्वच्छ गहन
आयनाच जादूचा,
दोन कुणा डोळ्यांचा.
साठविलें, गोठविलें
इवल्याशा वर्तुळांत
माझेंपण ज्यांनी तें
तेंव्हाचें,
अठराच्या अलिकडचें
किंचितसें पलिकडचें :
स्वप्नें नव बघणारें,
उध्वस्तहि करणारें,
तरणारें, बुडणारें,
अतिचंचल माझेंपण
साठविलें ज्यांनी ते डोळे—
छे, आयनाच जादूचा
भेट अशी कधि त्यांची
घ्याया मज आवडतें

म्हणुनिच मी आरशांत
डोळे मिटुनी बघतें!

# क्षणाक्षणाला जन्म नवा

क्षणाक्षणाला जन्म नवा अन्
क्षणोक्षणीं वेदना नवी;
जन्म मला अन् प्रसववेदना
मलाच कां व्हायास हवी?

देहावाचुनि जन्म आणखी
नाशावाचुनि मरण मिळे;
मनाहुनीही निरुपम सुंदर
कांहि तरी हृदयांत फुले.

जन्मांतरिंही त्या कांहींची
धाव परी तुजकडेच कां?
ठसा तुझा घेऊन उमलती
क्षण एकामेकांतुनि का?

तुझी असुनिही तूं नाही अन्
मी असुनी मज अनोळखी;
डोळे माझे गरुडाचे अन्
जात जिवाची फुलपंखी.

जननमरण हें लंघुनि जेव्हा
संज्ञा क्षण जागृत होते,
त्या संज्ञेच्या तीरावरती
कोडें माझें उलगडतें.

तूंच जन्म मज देसि प्रियतमा!
अद्भुत हें कैसें वडतें;
त्या जन्मांचें, त्या मरणांचें
वेड जिवा जडतें जडतें.

## नको म्हणूंस एकटी

नको म्हणूंस एकटी :
आहे सोबतीला सुख;
सुख पारखून घ्याया
उभें पाठीशीं हें दुःख.

तुझा माझा भक्तिभाव :
दुःख कसें म्हणूं त्याला ?
कष्ट काढितां काढितां
बळ देई जो हातांला.

येतें सुखास संगतीं
जातां संसारा सामोरी;
येतें विसाव्यास मात्र
वळूनीयां पाठमोरी.

# कावा

काय बाई सांगू तरी
तोहि आहे कुलवंत;
आला संध्येंत भिजून :
मेघ जसा—ही का रीत ?

धीट माझ्यावरी करी
केशराचा शिडकावा;
भिजतां मी—कसें सांगू ?
नाही ओळखिला कावा.

# त्या पत्रांतिल अक्षर

त्या पत्रांतिल अक्षर अक्षर
सांजसकाळीं, कधी अवेळीं
बांधि मनोरा हिमशिखरांचा,
आणि कोंडुनी मला एकली वेडी, दुबळी,
धुंद निर्मिते मायानगरी माझ्यापुढती;
अक्षर अक्षर हंस होउनी
अधरीं माझ्या चोच टेकुनी निरोप सांगे
रत्न खुणेचें मागे;
कधी कधी तर अक्षर अक्षर
ओठीं बोटीं घुटमळणारें वीजपाखरू तें संबोधन
उमटाया ना धजावलेलें, पहाटचें नक्षत्र लाजरें
स्वाक्षरिचें लाडकें विशेषण,
अपुलें आपण, जुळून जुळवुन
सशब्द समूर्त होतें,
हर्षभराने बावरतां मी खदखद हसतच विरतें;
अन् माझ्या श्वासाने केव्हा—
दुःख चोरटें, विरहमत्त शब्दांचे सगळे कळे उमलती
स्वप्नसुगंधा उधळित भाळावर केसावर रुळती;
कधी कधी हें शुष्क कोरडें अक्षर अक्षर
या डोक्यामधि घुसतें,
अन् गंगायमुनेमधि भिजतां
अक्षरांस त्या स्नेहल बाहू फुटती;
मला वेढिती—दुरितापासुनि संरक्षाया

त्या बाहूंवर, नीलधवल राजस हंसावर
विसावलें मी—सर्व विसरूनी, अशी अवेळीं
अक्षरांत गुरफटुनी !

# रिता घट सखे भरला ग

युगायुगांचा प्रवास खडतर क्षणामध्ये सखि सरला ग
कमरेवरचा जन्मजन्मिचा रिता घट सखे भरला ग
चुकली म्हणतिल वाट म्हणो कुणी घाटावर तर आलें ग
वळवळल्या बघ कितीक जिभल्या मी न कुणाला भ्यालें ग
रास संपली, म्हणतिल 'वेडी भासांतच ही फसली' ग
ध्यास जिवाला एकच या तर हसोत कोणी हसलीं ग
हाकारित तो स्वर आला अन् खुशाल मी अनुसरलें ग
शिरलें डोहीं उरे न पर्वा तरलें वा नच तरलें ग
घट हा माझा भरून द्याया अरूप रुपडें ल्यालें ग
झालें त्याची; कशास चिंता तम जरि दाटुनि आलें ग
तेजप्रसवा कूस अता ही भिणार का अंधारा ग
जन्मजन्मिचा घट तर भरला असो नसो भरणारा ग

# तुझ्या मनाचें आकाश

तुझ्या मनाचें आकाश
माझ्या माथ्यावरी उभें;
कधी दाट काळोखाने
कधी प्रकाशाने दुभे.

कधी आषाढझडीचा
गर्द आडोसा करून
वाटे उतरतें खाली
होतें क्षणाचें मीलन.

कधी वरूनिया येतो
इंद्रधनुष्याचा पूल;
'सखे, ये ना क्षण वरी'
म्हणे अशब्द आकुल.

माझी भोळीभाळी भक्ति
त्याच्या मेघांत रंगते;
माझ्या हुंदक्याने कधी
त्याची समाधि भंगते.

कधी रुसून चैत्रांत
असें तापतें तापतें;
वेडें, स्वतःच्या मापाने
कसें मलाही मापतें.

होतें—मापतां मापतां
अमाप मी त्याच्याऐशी;
दाही दिशा बुडतात
तुझ्या मनाच्या आकाशीं.

## अन् तेव्हापासुनिया

—अन् तेव्हापासुनिया
तंद्रींतच मी असतें;
मी असतें, तूं असती—
अन् भवती जग नसतें

दिन कैसा नकळे मज;
रातच नित शरदाची.
फुलत सदा मजभवती
जुइ तुझिया नजरेची

गंधधुंद चालत मी,
नकळे मज पथ कुठला;
सीमांकित कांहि उरे;
नीरवांत रव मिटला.

नभभरल्या नयनांनी
मजला तूं पाहिलेंस
अन् तेव्हापासुनिया
जगतें मी ही अशीच.

नजर तुझी फुलपंखी नाजुक,
हवाहवासा दंश तिचा अन्
लाख लाख नव पुष्पें होउन
गमे रहावें तुजला वेढुन.

कुणास ठावें फुलचुखीस त्या
मिळे मधू वा कांहि न मिळतें;
परि तिचिया प्रतिदंशें मी वर
मधूंत नाहत फुलतें फुलतें.

# वाट

वाट फुलतोरणांची—
चालणारी ना भुलली;
वाट स्वतांच भुलोनी
पायीं पायघड्या झाली.

वाट झाडवळणाची—
नवखीची कांपे काया;
वाट विळखा घालीत
बिलगली भित्या पाया.

वाट जळती विजेची—
चालणारी कशी संथ;
वाट होऊन चांदणें
झुळझुळे पावलांत.

वाट उंच चढणीची—
नाजुक ती चढे कशी;
पायउतार हो वाट
धूळमाखल्या पायाशीं.

वाट नाही संपणारी—
पोचणारी पोचे कशी;
वाट विसाव्याला आली
थकलेल्या पायापाशीं.

# दुःख असें हें

दुःख असें हें—बांधुनि तळिं मज
वरुनि शिळेसम ये तसुतसुने;
किंकाळी ओठांतच विरते,
अश्रु गोठती नेत्रिं भयाने.

शिळा परतते तसूतसूने;
वाटे क्षणभर सुटतें—सुटतें;
दुज्या क्षणीं ये छातीवरती
अन् धमनींतच रक्त गोठतें.

रक्त गोठतें असें कितीदा :
दुःख रोज ने मरणासन्मुख;
असेंच जीवन जगावयाची
कां ही शिक्षा जिवास अगतिक ?

# उत्तर

लिहावयाचें होतें उत्तर
हरखुनि गेलों पेन आणि मी.
आज लिहूं या मनांतलें अश्विनी चांदणें,
अर्थ विचारूं
त्या दिवशींच्या, डोळ्यामधल्या गुल्मोहराचा,
आणिक छेडूं, लिहून निळसर ग्लासामधलें
थंड सरबती केशर वादळ—
सरसावुनियां हिरवें लाघट पेन मनस्वी
लिहिली तारिख, पत्ता, आणिक—
अडलें तट्टू !
काय मायना—? लिही न कांही;
स्तब्ध पाहतें, स्तब्ध पेन अन् मीही निश्चल.
कागदांतले डोळे स्नेहल,
डोळ्यामधली कोसळणाऱ्या चांदणीसही
सावरणारी शपथ रेशमी,
दातरोविल्या ओठांआंतिल अशब्द वादळ,
या सर्वांच्या आवर्तांतुनि कसें सुटावें ?
ओवळ ये आग्रही खुर्चिला,
बधीर झालें भोळें टेबल,
भिरभिरुनीयां पेन टपकलें तबकामध्ये.
अन् घामाने हात निथळला.
अखेर उठलें—
समजावुनि गोंजारुनि धरलें पेन करामधि

लिहुन टाकिलें क्षणांत भरकन्:
स. न. वि. वि.
मन् सुटकेचा श्वास सोडिला.
सुटलों दोघें पेन आणि मी !

# स्वप्नगौर

आज अवचित कसें
मन उठे शिळेंतून,
कुणीं सजविलें घर
पाही चकित होऊन.

नाही कोणी आलें घरीं,
मीहि नाही गेलें दारीं
आल्या-गेल्या पावलांचा
मीना कसा भुईवरी ?

नाही मागितलें कोणीं,
मींहि नाही दिलें दान,
तरी दिल्या-घेतल्याची
कशी इथे तिथे खूण ?

कधी आली स्वप्नगौर ?
दिवा दाखविला कोणीं ?
सारें उदंड सुंदर
झालें दालनीं दालनीं

# धाम तुझें

हात तुझ्या हातांत असेतो
मी नसतें मी उरलेली :
वेल विजेची लवलेली.

सूर तुझा कानांत असेतो
घर नसतें घर उरलेलें :
स्वरांत सारें विरलेलें.

रूप तुझें डोळ्यांत असेतो
चंद्रसूर्यंही विझलेले :
जग भवतीचें थिजलेलें.

गंध तुझा श्वसनांत आणि रस
जिव्हेवरती नाम तुझें :
देहच सगळा धाम तुझें.

# स्तब्ध किनारी

...राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 33273 वि:
क्रमांक 2454 नों दि

स्तब्ध किनारीं उभी राहतां
ओढिलेंस कां लाट होउन ?
लाटेंतहि स्थिर होतां पाउल
चळविलेंस का वाळू घळवुन ?

फेनफुलांपरि मिरविलेंस का
शिरिं घेउनि अन् हृदयीं कवळुन
आणि किनारा सुटतां आता
परतलास का ओहट लागुन ?

ओहटिलाही ओढ अशी कां
उधाण कसलें येतें मागुन
नको नको—तें उधाण—देइल
किनाऱ्यावरी मज भिरकावुन :
जिथे न तूं, ना उधाण-ओहट;
फक्त किनारा, अन् एकुटपण !

# जिद्द तुझी

जिद्द तुझी विसरावें मजला :
विसरशील मम शब्द खुळे; पण
विसरशील का अर्थ कोवळा
बसला जो श्वासांतच अडकुन?

जिद्द तुझी, विसरूं ती दृष्टि
सृष्टि जिने उभविली नवोनव :
विसरशील हे सजल नेत्र पण;
विसरशील का तो नयनोत्सव?

जिद्द तुझी विसरावें मजला :
विसरशील ही मम आकृति पण;
देण्या-घेण्यापलिकडचें तें
विसरशील का मूक समर्पण?

## स्वप्नभूल

ओसाड त्या राउळास
पुन्हा वळे का पाऊल?
काय शोधी येथे तेथे
घेई कोणाची चाहूल?

झडलेली जाईजुई
क्षण खिळविते डोळे;
शुष्क कारंज्याच्या खाली
जीव कासावीस पोळे.

भिंती फिक्या फिक्या झाल्या,
चित्रें वाकडींतिकडीं;
जीर्ण देव्हाऱ्याला झालीं
देवतांचींच साकडीं.

उखणल्या जमिनीची
वस्तूवस्तूवर धूळ;
नक्षीदार पंचकाची
उडालेली स्वप्नभूल.

अष्टपैलू लोलकांचीं
दीपविझलीं झुंबरें;
बंद केलेल्या दालनीं
कुंद सुंद वास फिरे.

परि अवचित कधीं
झळाळतें तें राऊळ :
फुटलेल्या छतांतून
खाली उतरे आभाळ.

सारीं पेटती झुंबरें;
देठोदेठीं फुले वेल;
येते निवाऱ्याला पुन्हा
उडालेली स्वप्नभूल.

## तूं

दिवस आपला तेजाचा पिसारा फुलवीत
दिमाखाने मिरवत असतो.
गर्द निळी जरीबुंदी ओढणी घेऊन
रात्र अभिसारासाठी आतुर असते.
पण तुला या दोघांचीही परवा नाही;
दिवस-रात्रींच्या अतीत होऊन
तूं फिरतोस माझ्याबरोबर
माझ्या दुखावलेल्या, अडखळत्या पायांना बळ देत.
मार्गांत माझ्या स्वप्नांचे ससे
कान उभारून टकमकत असतात
सदाच्याच अबोध भीतीने
त्यांच्यापुढे लुसलुशीत हिरवळ होऊन
तूं उभा राहतोस धीर देत.
दिशा न समजण्यासारखी भोवळ
गिरगिरत असते माझ्या जळजळणाऱ्या डोळ्यांत
तेव्हा ध्रुवतारा होऊन तूं शीतल ओठ टेकवतोस
माझ्या पापण्यांवर
आणि मग हे पाय अचूक पोचतात
पोचावे तिथेच.

# अतृष्ण

माझ्या मनामधल्या रात्री,
  एकदा तरी यायचें विसर;
एकदा तरी दुसऱ्या कुठे
  आपली काळी छाया पसर.

पुरेत तुझ्या जांभया अन्
  पुरे तुझी रिती नीज;
एकदा तरी केसांमध्ये
  नाजुकशी माळ बीज.

भुतासारखे वेडेविद्रे
  हावभाव करूं नको,
भिववायचा मला उगीच
  हट्ट खुळा धरूं नको.

खरंच सांगतें, मनांत तुझी
  भीति आता उरली नाही,
जरी तुझी माझ्या घरची
  ये-जा अजून सरली नाही.

यायचेंच तर अशी सुस्त
  जड पावलें टाकूं नको,
आपला कोवळा चेहरा असा
  बुरख्याखाली झाकूं नको.

ऐक जरा; एकदा तरी
   पायामध्ये पैंजण घाल;
एकदा तरी वसंतांतल्या
   वाऱ्याचा धर ताल.

भिजत यायचें? खुशाल ये;
   पण आठवीत ये ना राधा;
उन्मनस्क होऊन ये;
   उधळ थोडी निळी बाधा.

उगीच नको भीति दाखवूं:
   सगळीकडेच आहे कृष्ण;
पिऊन मुरली मी तर केव्हाच
   झालें आहें अतृष्ण!

# तुला कल्पिलें मी होतें

तुला कल्पिलें मीं होतें
जसा एकाकी मनोरा :
घुसे आकाशांत उंच,
मोजी सूर्य, मोजी तारा

मनोऱ्याचें विरे स्वप्न :
स्वप्नें सारींच विरती;
ठरे खोटाच फुलोरा;
क्षुद्रतेच्या गुंतागुंती.

नव्हतास एकसंध,
नव्हतास दुभंगला;
तुझा माझा भावबंध
नाही कधीच जुळला.

आज मात्र एकाएकी
दुभंगून उन्मळून
पडलास, आणि झालें
तुझें आगळें दर्शन.

रक्ताविण संज्ञेविण
तुझें माझें जुळे नातें;
तुझ्या थोर दुःखापुढे
माझें नम्र होतें माथें.

## मनस्विनी

माझी मनस्विनी श्रद्धा
तुझ्या दारापाशीं आली
आणि उंबऱ्यावरच
श्रांत तिष्ठली तिष्ठली.

दार उघडलें किंवा
झालें न झालें दर्शन;
कांही कांहीच बोलेना
न्याहळीते फक्त शून्य.

अशी पायरीशीं हटे,
चल म्हणतां चलेना;
दार उघडें तरीहि
आंधळीला तें दिसेना.

गीत गळ्याशीं दाटलें,
सूर फुटतां फुटेना;
आणि तुझ्या पापणीला
ढळ पोचतां पोचेना.

सूर फुटतां फुटेना—
आणि फुटलाच तर?
नको ढळू कळवळूं;
धीर मात्र गोळा कर.

# वळिवाचा पाऊस

झपाटतो वळिवाचा पाउस
        धारांचा घालित विळखा,
निळीजांभळी वीज चमकते
        मातीवर दावित रेखा.

रेखा होती गढूळ साऱ्या,
        उरतच नाही मुळिं माती;
तरूतरूंना ओढ लागुनी
        मुळापासुनी थरथरती.

गुल्मोहर झडझडुनी गळतो
        लाल सडे घालीत तळीं;
आणि धरेच्या व्यथेस फुटते
        एक कुसुंबी धुंद कळी.

एक कळी पण रतिआरतिची,
        लाख ज्योत पेटे अंगीं;
वळिव अभोगी क्षणांत जाई
        सुगंधेला करुनी जोगी.

# टकटक

कोण आलें अनाहूत टक टक करीत दारावर ?
आहे का या टकटकीला संकेताचा ताल स्वर ?

कोण आहे ? नांव सांग; राजपुत्र ? यक्ष ? यम ?
अरे नको वाढवूं लय : सभ्यतेचे पाळ नियम !

होणार आहे काय प्रलय ? आकाश का फाटलें आहे ?
बोटांच्या या आघातांत भविष्य का साठलें आहे ?

टकटकीचा खडा लागून अमृतघडा फुटतो आहे,
प्राण जसा धनुकलीच्या दोरीवरून सुटतो आहे.

बोल, बोल; स्तब्धतेने चढतो आहे सारखा सूर—
कसें मधलें दार उघडूं ? तें तर झालें किती दूर ?

अवेळींच आमंत्रण ? की झालीच आहे वेळ ?
कळतें असेंच कांही—तरी उरांत उठते खोल कळ.

टकटक—पायावरती कोण खिळे ठोकतें आहे ?
अडद्यांतून कोण अशी वाट माझी रोखतें आहे ?

बाहेर तर नुसता काळोख: आहे म्हणा तुझी सोबत;
कुणाची पण ? कळत नाही—भीति येते पंख झापत.

तरीहि पण अर्धा जीव कधीच बाहेर पोचला आहे;
येतेंच—पण गालिचांतला काटा पायांत बोचला आहे.

हळू हळू, थांब जरा; एकदाच हें पाहून घेतें:
हें घर, ही हवा—एकदाच यांत नाहून घेतें.

कोण आहेस ? कुठे नेशील ? परतीची आहे भाषा ?
कसें सांगूं ? गुंतल्या आहेत इथे-तिथे मनच्या आशा;

पुढच्याची वाटते ओढ—तरीही हा पाय जड;
थांब जरा गिळूं देत पोटामधले कोवळे कढ !

तव जीवनलहरींवर
फेकियलें सुम माझें;
आशा की कधि पळभर
घेशिल तळव्यांत तया !

भरलिस तू ओंजळहि;
सुम माझें त्यांत एक.
हुंगिलेंस—खत परी
ओळखिलें तूं न तया.

. २ .

शब्दांच्या शृंखलांत
होइल का बद्ध भाव
की लपवाया बघणें
हृदयांतरिंचा अभाव ?

कळतें हें, तरि हृदया,
तडफडसी शब्दास्तव;
शब्दांतच भवतीचें
विसरू बघसी वास्तव.

. ३ .

पानांतिल थरथर ही
कां आजच करचरणीं;
कुहुकुहुतिल व्याकुळता
कां वृथाच नयनांतुनि.

तारेवर थेंब जसा
अधिरता तशीच मना;
कोसळणें कोठ ज़िवा
कळतच ना! कळतच ना!

. ४ .

गहनगूढ नयनांचे
उघडुनिया दरवाजे
दाविलेंस मज नंदन
कल्पनेंत नव्हतें जें.

पण इथेहि 'फळ'भारें
लवलेला 'ज्ञान'वृक्ष
'अमृतफल तोड' म्हणे
वेधुनियां घेत लक्ष!

. ५ .

ना व्हावा बंध मनीं
या माझ्या भक्तीचा;
रोधावा भक्तीने
मार्ग न कधि मुक्तीचा

जातां तूं तिमिरांतुनि
क्षण व्हावें मी पणती;
तपतां रवि शिरिं व्हावें
धार मुखीं झुळझुळती

आणिक तव श्रम हरतां
करशिल स्मित तृप्तीचें;
त्या स्मितांत होइल रे
सार्थक मम भक्तीचें !

...ग्रंथ संग्रहालय, ठा...
...क्रमांक ३३७२३..... दि:
...क्रमांक ....१४५८.... नों

. ६ .

मोहाचा गुल्मोहर
अन् विषण्ण बकुलफुलें,
सोनेरी संभ्रमांत
कधि गुलाबगेंद डुले;

प्रीतीचा पारिजात
आर्त मधुर परिमळतो,

कधि प्रमत्त मोगराहि
नजरेंतुनि घमघमतो.

दृष्टींतुनि वृष्टि अशी
स्वप्नसख्या ! करुनि शिरीं
जातां तूं गंधकसा
गंध मात्र पेटे उरीं !

.७.

फूत्कारत तम अपार
सळसळते भवति हवा;
ओळख ना मुळि दिशांत
ना वाटेवरती दिवा.

तों अवचित क्षितिजावर
नाम तुझें अवतरतें;
अन् वादळिं झुंजण्यास
हृदयीं ये धीर नवा !

.८.

शोधशोधितां अखेर
विश्रांतिस्थल लाभे;
ना अभेद्य छत वरती
वा नाहित गजहि उभे.

झुळझुळतें नितळ सलिल
कल्पतरू दे छाया;
स्पर्शाविण शांत करित
क्षितिजांची घन माया.

"रक्षावें तें रक्षिन"
ग्वाही दे नभच इथे,
इंद्रकोश उघडुनियां
"इच्छित तें घे" म्हणतें.

दान असें हें अपार,
कर दोनच;—बद्ध तेहि;
घेउं कशी अगतिक मी,
चूर चूर मन होई.

समजुनि मम दुबळेंपण
देइं सर्व दिधल्याविण;
या अपूर्व स्नेहाचें
मिरविन शिरिं शाश्वत ऋण!

. ९ .

सरला हठयोग अता,
सरलें तें तप दारुण;
आज प्रतीक्षा सरली
धगधगती हृदयांतुन.

ये उषाच नीलारुण,
शांति तशी ये हृदयीं;
आता आनंद मात्र
तेजांतहि तिमिरांतहि.

. १० .

नव्हतें मी भानावर
वर जेव्हा तूं दिधले;
अन् येतां भान कळे
दानाने कर भरले.

ठेवुं कुठे वैभव हें
रक्षुं कशी ? मी दुबळी
शोधुं कुठे आणि कशी
पदचिन्हें पुसलेलीं ?

REFBK-0012746
REFBK-0012746

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम
क्रमांक
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
92684